जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ४७ दिनांक - २१/०१/२०२५**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# हडपसर पोलीस ठाणे अंतर्गत खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस सात वर्षे सश्रम कारवासाची शिक्षा

सदर घटना ही डावरी नगर, लोखंडी पुलाजवळ, पाण्याच्या टाकीजवळ, हडपसर पुणे येथे दिनांक २७/०६/२०१६ रोजी घडली आहे. यातील आरोपी **१) गणेश सुभाष वाबळे, वय २४ वर्षे, रा. डावरीनगर, लोखंडी पुलाजवळ, कॅनॉलजवळ, पुणे याने कुत्रा अंगावर धावून गेल्याचा राग मनात धरुन आरोपी २) गोरक्ष नामदेव लोंढे, वय २० वर्षे, रा. माळवाडी, हडपसर, पुणे ३) उमेश उत्तरेश्वर खंडागळे, वय २० वर्षे, रा. शेवाळवाडी, हडपसर, पुणे ४) प्रदिप ज्ञानदेव करपे, वय २२ वर्षे, रा. काळेपडळ,पुणे व ५) किशोर बापू लोंढे, वय १८ वर्षे, रा. माळवाडी, हडपसर, पुणे** यांच्यासह येऊन गैरकायद्याची मंडळी जमवून यातील मयत नामे सागर नामदेव चौगुले यासं लाकडी दंडुका व सिमेंट ब्लॉकच्या साहाय्याने जिवे ठार मारल्याने हडपसर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुन्हा क्रमांक ५०२/२०१६ भा.दं.वि.कलम ३०२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,४२७,५०४ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१)(३),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास श्री. संदिप देशमाने, पोनि यांनी केला व यातील आरोपी विरुद्ध मा.न्यायालयामध्ये मुदतीत दोषारोपपत्र सादर केले.

वरील प्रकरणामध्ये सबळ साक्षीपुराव्याअंती मा.जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी आरोपीस दिनांक २१/०१/२०२५ रोजी सात वर्षे सश्रम कारावास व ५० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास नऊ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

कामगिरी सरकारी पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्रीमती.निवेदिका काळे, कोर्ट पैरवी पोलीस अंमलदार अविनाश गोसावी,यांनी कामकाज पाहिले.

सदर कामगिरीकरीता प्रोत्साहन म्हणून डॉ.राजकुमार शिंदे (भा.पो.से),पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५,पुणे शहर यांनी कोर्ट पैरवी पोलीस अंमलदार अविनाश गोसावी व नमूद गुन्हयाचे तपासी अधिकारी पो.नि संदिप देशमाने यांना १० हजार रुपये बक्षिस मंजूर केले आहे.